# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

मा. विशष महासभा दि. ०१/१०/२०२१

शुक्रवार दि. ०१/१०/२०२१ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.३० वाजता सभा सुचना क्र. ०४ दि. २७/०९/२०२१ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता Video Conferencing द्वारे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सभागृह नेता |
| ४) | जैन दिनेश तेजराज | सभापती, स्थायी समिती |
| ५) | पाटील प्रविण मोरेश्वर | विरोधी पक्षनेता |
| ६) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ७) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ८) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ९) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| १०) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| ११) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| १२) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १४) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १५) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १६) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १७) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १९) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| २०) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २१) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २२) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २३) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २४) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २५) | जैन गीता भरत | सदस्या |
| २६) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| २७) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| २८) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २९) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| ३०) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३१) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ३२) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| ३३) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| ३४) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३५) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३६) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३७) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ३८) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ३९) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४०) | डिम्पल विनोद मेहता | सदस्या |
| ४१) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४२) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४३) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४४) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४५) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ४६) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ४७) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ४८) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४९) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५०) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५१) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५२) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५३) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ५४) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५५) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ५६) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५७) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ५८) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ५९) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६०) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६१) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६२) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६३) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६४) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६५) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६६) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ६७) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ६८) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ६९) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ७०) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ७१) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७२) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७३) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ७४) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ७५) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ७६) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ७७) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ७८) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ७९) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ८०) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |
| ८१) | शर्मा भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८२) | ॲङ शफीक अहमद सादत खान | नामनिर्देशित सदस्य |
| ८३) | भोसले अनिल बाबुराव | नामनिर्देशित सदस्य |
| ८४) | अजित भगवान पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ८५) | सिंह विक्रमप्रताप रमाप्रती | नामनिर्देशित सदस्य |

गैरहजर सदस्य -

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| २) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| ३) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| ४) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ५) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ६) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| ७) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ८) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ९) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| १०) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ११) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| १२) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| १३) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |

रजेचा अर्ज - निरंक

नगरसचिव:-

आजच्या ऑनलाईन होणाऱ्या विशेष महासभेमध्ये सहभागी झालेल्या सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत आहे. राष्ट्रीय गीत वंदे मातरमसाठी सर्वांनी आपल्या जागेवर उभे राहायचे आहे.

मा. महापौर :-

सचिव साहेबांनी सभेला सुरूवात करावी.

प्रशांत दळवी:-

मा. महापौर मॅडम आजची विशेष महासभा सूरू करण्यापूर्वी नुकतेच मिरा भाईदर महानगरपालिकेचे सार्व. बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. दिपक खांबित यांच्यावरती बुधवार दि. २९/९/२०२१ रोजी भ्याड हल्ला करण्यात आला आणि महापौर मॅडम अशा प्रकारचे हल्ले हे

कुठल्याही अधिकारी कर्मचाऱ्यांवरती जर होत असेल तर हे आपण खपवून घेतले जाणार नाही म्हणून ज्या दिवशी दि. २९/९/२०२१ रोजी आपल्या कार्यालयातून खांबित साहेब घरी जात असतांना त्याच्यावरती मोटरसायकलवरून त्यांच्या वाहनाचा पाठलाग करण्यात आला व त्यांना बोरिवली नॅशनल पार्कच्या दरम्यान त्यांच्यावरती त्यांच्या गाडीला ती गोळी लागून गेली त्यांचा जीव त्याच दिवशी गेला असता परंतू ते थोडक्यात बचवले आहेत आणि म्हणून महापौर मॅडम, आयुक्त महोदय ह्या मिरा भाईदर महानगरपालिकेचे प्रवेशद्वार आहेत त्याठिकाणी आपण मेटल डिटेक्टर बसवले होते पण आता ते काही काम करत नाही आपण सुरक्षा यंत्रणा त्या ठिकाणी नवीन लावलेली आहेत त्यांना ही आपण जे नियम फॉलो करत होतो, किंवा आपण जे आदेश दिलेले आहेत त्या आदेशाचे पालन होत नाही. आयुक्त महोदय, आपल्याला विनंती राहिल की आपण ते आदेश फॉलो करावे जेणे करून इन आणि आऊटचे आपण नियम आखून दिलेले आहेत त्याची पूर्तता पूर्ण झाली पाहिजे. नाहीतर ह्यासाठी आयुक्त महोदय, मी सांगेल की कोणीही बाहेरचा व्यक्ती आपल्या अधिकाऱ्याना किंवा लोकप्रतिनिधीना त्यांच्या चेंबरमध्ये भेटायला येतात त्यावेळी ते मेटल डिटेक्टरमधून त्यांने जाणे गरजेचे असते कारण कूठल्याही वेळेले कोणताही माणूस कधीही मग तो अधिकारी असेल लोकप्रतिनिधी असेल मिरा भाईदरचे नागरिक असो, ह्या नागरिकांना आपला जीव मूठीत घेवून ह्या महानगरपालिकेत वावरणं म्हणून जे मेटल डिटेक्टर आपण प्रवेश द्वारावरती लावले होते आपल्या तिसऱ्या माळेवरती जे सभागृह आहे त्याठिकाणी लावले होते त्याची ही पूर्तता करावी. महापौर मॅडम ते ही चालू करण्यात यावे. आयुक्त महोदय आपण ऑगस्ट महिन्या अगोदर त्यांना मुख्य प्रवेशद्वारातून येण्यासाठी नियमक त्याठिकाणी कर्मचारी यांना आपण त्यांचे टायमिंग आखून दिले होते ते कुठल्या टायमिंगमध्ये येणार परंतू सुरूवातीला थोडे दिवस त्यांची पूर्तता करण्यात आली. आयुक्त महोदय माझ्या निदर्शनास असे आलेले आहे की, परत त्याची कुठल्याही प्रकारची पूर्तता करण्यात येत नाही. म्हणून महापौर मॅडम आपल्या स्तरावरती आपण त्यांना आयुक्त महोदय आदेश देण्यात यावे. मिरा भाईदर महानगरपालिकेमध्ये उच्च पद अधिकाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून आयुक्त महोदय त्यांना सुरक्षा रक्षक नेमण्यात यावा असे माझे वैयक्तिक मत आहे आणि मग कार्यकारी अभियंता हे शहरात पूर्णवेळ महापालिकेच्या मुख्य कार्यालयात न बसता ह्या शहराच्या विविध योजनेसाठी त्यांना ह्या शहरात बाहेर रहावे लागते आणि म्हणून श्री.दिपक खांबित हे अतिशय हुशार, अभ्यासू व कर्तव्यदक्ष आणि प्रामाणिक अधिकारी ह्या शहरातील सर्वपक्षीय नगरसेवकांच्या प्रभागात त्यांचा विकास कामावरती बारीक जातीने लक्ष असते आणि म्हणून ह्या सभागृहाच्या वतीने काल जो त्यांच्यावर भ्याड हल्ला झाला त्याचा मी जाहिरपणे निषेध करतो. कार्यकारी अभियंता श्री. दिपक खांबित ह्यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा सर्व स्तरावर निषेध व्यक्त केले जात असताना ह्या हल्ल्याची मुंबई पोलीस, मिरा भाईदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयानी गंभीर दखल देखील घेतलेली आहे. पुढील तपास सूरू केलेला आहे ह्या हल्लेखारांना तातडीने अटक करावी व त्यांच्या विरोधात मोठा गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मी ह्या सभागृहाच्या वतीने व भारतीय जनता पक्षाच्या वतीने मी मागणी करतो आहे आणि म्हणून महापौर मॅडम, अशा प्रकारचे हल्ले जर ह्या मिरा भाईदर क्षेत्रामध्ये आपले अधिकारी असेल की मग आपले लोकप्रतिनिधी किंवा मग शहरातला नागरिक यांच्यावरती असे हल्ले होणार असतील तर आयुक्त महोदय, महापौर मॅडम आपण खपवून घ्यायचे नाही आणि महापौर मॅडम, मी ह्यांच्यावरती जाहिर निषेध करतो. धन्यवाद.

मा. महापौर:-

सचिव साहेब विषय पत्रिकेवरील जे विषय आहेत ते वाचायला सूरूवात करा.

नगरसचिव:-

मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. विशेष महासभा शुक्रवार दि. ०१/१०/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता Video Conferencing द्वारे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी Video Conferencing द्वारे आयोजित महासभेमध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी सहभाग घ्यावा हि विनंती.

निलम ढवण :-

आताच सन्मा. प्रशांतजी दळवी ह्यांनी जो निषेध व्यक्त केला, हा जो ३० तारखेला सन्मा. खांबित साहेबांवर झालेला हा भ्याड हल्ला ह्याचा निषेध मी शिवसेना पक्षाच्या वतीने करते परंतू आज खांबित साहेबांवर हल्ला होवू शकतो तर इतरही अधिका-यांनी त्याची सावधता बाळगण्याची गरज आहे त्यामूळे आयुक्त साहेब, महापौर मॅडम सर्व जे प्रभाग अधिकारी आहेत त्यांना कक्षासहित सिक्युरिटी आणि त्यांना बाहेर येता आपण त्यांनी जी सुचवलेल्या ज्या गोष्टी आहेत त्या आपल्या पालिके पुरत्या मर्यादित आहेत परंतू पालिकेच्या बाहेर पडल्यानंतर देखील त्यांची सुरक्षितता देखील फार महत्वाची आहे, हे देखील आपल्यातर्फे अधिकारी जरी असले ते काम करित असतांना अशा काही गोष्टी एखाद्या पॉझिटिव्ह निगेटिव्ह असे होत असतात आणि त्याचा राग ठेवून जर असे काही असेल तर त्यासाठी सर्व अधिकाऱ्यांना आणि महत्त्वाच्या कर्मचा-यांना सुरक्षा आपण द्यावी आणि मी आपल्याला शिवसेना पक्षाच्या वतीने विनंती करते आणि झालेल्या निषेधाच्या, झालेल्या भ्याड हल्ल्याचा लवकरात लवकर तपास होण्यासाठी आपण फॉलो ठेवावा आणि त्या व्यक्तींना अशी जरब बसावी की पुन्हा कोणीही अशी घटना करण्याचं त्यांनी कधी धाडस करू नये अशा पध्दतीची फास्ट ट्रॅकवर त्यांना शिक्षा देवून त्याच्याबद्दल आपण सर्व अधिकाऱ्यांना सुरक्षितता द्यावी ही आपणांस विनंती आणि पून्हा एकदा ह्या भ्याड हल्ल्याचा शिवसेना पक्षाच्या वतीने निषेध करते.

चंद्रकांत वैती:-

नमस्कार मॅडम, आयुक्त साहेब नमस्कार हा जो प्रकार मिरा भाईदरमध्ये एका अधिकाऱ्यावरती अशा प्रकारे हल्ला होतो, कार्यकारी अभियंता वरती साक्षात मृत्यू त्यांच्या समोरून गेला. केवळ दैव बलवत्तर आणि परमेश्वराच्या आशीर्वादाने ते सुरक्षित राहिले. त्या हल्ल्यामागे नेमकी काय भूमिका होती काय नाही आयुक्त साहेब आपण जर मान्य करत असाल तर नेमक निवेदन झाल पाहिजे, ती कशा संदर्भात की व्यक्तीगत स्वरूपात काय हल्ला करता येत असेल तुम्हाला निवेदन तर असे हे नाही कारण पोलिस काही गोष्टीला मान्यता देत असतील तरच तुम्हाला त्याच्या संदर्भात निवेदन करता येईल. परंतू ह्यासाठी महापालिकेचे सर्व कर्मचारी सर्व लोकप्रतिनिधी मी तर म्हणेल मिरा भाईदरची जनता देखील ह्याबाबतीत खांबित साहेबच्या सोबत पूर्ण ताकदीने उभे आहेत. परंतु नेमकं काय झाले ह्याबाबत थोडासा खुलासा करता आला जर पोलिसांची मान्यता असेल तर, नसेल तर मग त्याच्या तपासासाठी आयुक्त साहेब आम्ही तुमचे अनेक निर्णय असे बघितले आहेत की ते तुम्ही पूर्णत: देतात. तर उच्च स्तरीय विनंती करून आपल्याला ह्या घटनेचा पर्दापाश करता येईल त्याच्यावरती आपण थोडस बोलाव अशी विनंती आहे.

विक्रम सिंग :-

मेयर मॅडम धन्यवाद, आयुक्त महोदय आज महासभा मे मेरा पहला भाषण है, शिवाजी महाराज की धरती, बाळसाहेब ठाकरे, और बाबासाहेब भिमराव आंबेडकर की धरती महाराष्ट्र और मिरा भाईदर के महासभा मे आज मेरा पहला प्रबोधन है, मैं आप सभी को धन्यवाद देता हूँ। मेरे पक्ष प्रमूख मा. श्री. उध्दवजी ठाकरे साहब को दुॅगा जिन्होने मुझे औसर प्रदान किया इस महासभा मे आने का मैं अपने युवा नेता आदित्य साहब को धन्यवाद दुँगा और मिरा भाईदर के लाडले आमदार हमारे प्रतापजी सरनाईक को धन्यवाद दुँगा तथा हमारे खासदार राजन विचारे को धन्यवाद दुँगा, तथा हमारी विधायक गिताजी जैन को धन्यवाद दुँगा, तथा हमारे ठाणे के पालकमंत्री मा. श्री एकनाथजी शिंदे साहब को धन्यवाद दुँगा, तथा हमारे शिवसेना मिरा भाईदर के जिल्हा प्रमुख प्रभाकरजी म्हात्रे तथा

हमारे विरोधी पक्षनेता प्रविणजी पाटील हमारे गटनेता निलमताई ढवण उसके बाद हमारे वरिष्ठ नगरसेवक राजु भोईर और तमाम शिव सैनिक को मै धन्यवाद दुँगा । निश्चित तौर पे जिन्होने १८ से २० सालो तक इस मिरा भाईंदर मै बहूत कुछ सिखा और हम सब आज सदन मे, मै पहली बार बोल रहा हूँ लेकीन हम लोग संघटन के कार्यकर्ता है, सडक पे हम बात करते है सदन मे पहली बार बात करने का मौका मिला है। तो यह हमारे शिवसेना पक्ष की और जैसे हमारे प्रतापसरजी नाईक और राजन विचारे, गिताजी जैन, मै आज किसी विषेश विषय पर बात नही करुंगा लेकीन, इसी तौर पे मै बात करुंगा की कोई भी नया सदस्य आता है तो निश्चित तौर पे उसे बोलने का औसर जरुर दिया जाए, हमारे पास मेंबर है जिसमे तीन पुराने है, और मै एक नया हूँ, एक अजित पाटील साहब तो निश्चित तौर पे ऐसे नये सदस्य सदन मै आये तो कहीना कही उनकी भावनाओ को व्यक्त करने का औसर उनको मिलता है। यह मेरा निवेदन है और बहूत सारे युवा जो हमसे भी युवा है वो पहिले सदन मै आवे तो निश्चित तौर पे उनकी भावनाओ को शहर मै क्या चाहते है वो कहीना कही इस शहर के विकास के लिये और इस शहर के सांस्कृतीक विरासत के लिये कुछ बाते रखना चाहते है तो उनको हमेशा औसर मिलना चाहिये। क्योकी हम आधुनिक विकास की तरफ निश्चित तौर पर हमारा शहर बढ रहा है उसमे सभी का योगदान है। मैं किसी की खिचाई और बुराई नही करुंगा निश्चित तौर पे पुरे सदस्याओ का बहुत योगदान है। लेकीन जो हमारा सांस्कृतीक विरासत है, सांस्कृतीक परंपरा है मिरा भाईदर के सांस्कृतीक पहचान है यह भारत का आईना है ऐसी हसीओ का खुलासा करना है और जो विषय चलाया निश्चित तौर पे दिपक खांबितजी वो बहुत अच्छे अधिकारी है । १५-२० सालो से उन्होने यहाँ पे सेवा दिया है, यहा पे जैसे आयुक्त महोदयने बहुत अच्छे काम आने के बाद किये है, बहुत सारे अच्छे ऑफिसर है जिनके योगदान इस शहर मै है, इनके उपर कोई हल्ला होता है, कोई हमला होता है तो हम सब जो सभी पक्ष के लोग मिल के उनके साथ है । सभी अपने अधिकारी के साथ है, ऐसे क्राईम और ऐसे परंपरावो का जो है इस शहर मै यह नही होना चाहिये। हमारे कई सदस्य है जिनके उपर हमला हूवा है, पाटीलजी के उपर ऐसे ही हल्ला हूवा है तो निश्चित तौर पे ऐसे लोगो को पकडा जाये और उनको कडी से कडी सजा दिया जाये और मै अफसोस करना चाहूँगा की हमारे महाराष्ट्र के मुख्यमंत्री उध्दवजी ठाकरे है वर्तमान समय मै है । मेयर मॅडम धन्यवाद आयुक्त महोदय मै धन्यवाद देता हू आपने मेरी बात मुझे रखने का मुझे औसर दिया आगे महासभा मे अपने विषय को सही बात करेंगे और बहूत बहूत धन्यवाद

ध्रुवकिशोर पाटील :-

दिपक खांबित कार्यकारी अभियंता यांच्यावर झालेला हल्ला हा भ्याड हल्ला आहे याचा आम्ही निषेध करतोय आणि एक चांगल्या अधिकाऱ्यावरती जो हल्ला झालेला आहे. मी गृहमंत्री आणि तसेच ह्या राज्याचे मुख्यमंत्री यांना मी आव्हान करतो, त्यांना मी निवेदन करतो की लवकरात लवकर खांबित यांच्यावरती जो हल्ला झाला जे हल्लेखोर आहेत त्यांना ताबडतोब पकडण्या करीता आपण पोलिसांना आदेश द्यावेत आणि पकडल्या नंतर लवकरात लवकर न्यायालयामध्ये तुम्ही केस चालवावी आणि ज्यांनी गुन्हा केलेला आहे त्यांच्या वरती लवकरात लवकर कारवाई व्हावी आणि आयुक्त साहेबांना आमचे निवेदन आहे की आयुक्त साहेब जे अधिकारी आपल्या इथे काम करतात यांचे संरक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे तर आपण याच्यावरती विचार करावा धन्यावद मॅडम.

प्रविण पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आपले कार्यकारी अभियंता दिपक खांबित साहेब, यांच्यावर जो परवा दिवशी हल्ला झाला त्याचा सर्वप्रथम आम्ही निषेध करत आहोत. सर्वांनीच मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अधिकारी असोत किंवा नगरसेवक असोत किंवा लोकप्रतिनिधी किंवा मिरा भाईंदर महानगरपालिकेचे असोत सर्वांनी त्याचा निषेध व्यक्त केला. त्याच्या पुढे जावून आता हा मिरा भाईंदर महानगरपालिका असो किंवा प्रशासकीय अधिकारी असोत मागच्या महिन्यामध्ये ठाण्याच्या एका

अधिकाऱ्यावर हल्ला झाला आणि आज आपल्या कार्यकारी अभियंता दिपक खांबित साहेब यांच्यावर हल्ला झाला म्हणजे प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे सुरक्षेच्या दृष्टीकोणातून तर सर्वपक्षीय कालच एक निषेध सभा आपल्या कामगारांनी किंवा अधिकाऱ्यांनी केली होती. आयुक्त साहेब आपण त्यांना दुजोरा दिलेला आहे तर त्याच्याही पुढे जावून आपण आयुक्तांना मागणी केली होती की लवकरात लवकर जे हल्लेखोर आहेत त्यांचा तपास लावावा. त्यांना योग्य ते शासन व्हावे तर हा जो प्रश्न निर्माण झालेला आहे त्याच्या बदल प्रशांत दळवीने जी मागणी केलेली आहे ती पुढे जावून मी सांगतो मेटल डिटेक्टर हा एक महत्त्वाचा विषय आहेच पण सुरक्षेचा दृष्टीकोणातून सुरक्षा रक्षक आणि ते रिटायर्ड झाले असावेत असाही एक आपल्यापुढे आव्हान तयार झाले आहे. आपणही ते सुरक्षा रक्षक लोकप्रतिनिधी जे लोकप्रतिनिधी आहेत तसेच त्याच प्रमाणे अधिकारी आहेत त्यांना द्यावेत आणि त्यांचा लवकरात लवकर तपास कसा होईल अशी आग्रही मागणी आहे. आयुक्त साहेब आपण ही मागणी करावी, वैती साहेबांनी सांगितल्या प्रमाणे जर जमत असेल तर आपणही याबाबत निवेदन करावे जेणे करुन मिरा भाईंदर शहरामध्ये आणि समाजामध्ये एक तर्क वितर्क केले जातात की हल्ला नेमका कशामुळे झाला आणि त्याचा लवकरात लवकर तपास होणे जरुरीचे आहे. म्हणून आयुक्त साहेब आपल्याला जमत असेल तर कायद्याच्या अखत्यारीत राहून जर काही बोलात येत असेल ह्या विषयावरती तर आपण योग्य ते निवेदन करावे अशी आपणास विनंती.

मा. महापौर :-

प्रशासनाच्या वतीने आयुक्त साहेब यावर जरा आपण खुलासा करावा.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, तत्पुर्वी भगवती शर्मांना थोडे बोलायचे होते त्यांचे झाले की आयुक्त साहेब खुलासा करा अशी माझी विनंती आहे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य भगवती शर्माजी आपण बोला.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम सबसे पहले मैने वो कल की घटना घटी श्री. दिपक खांबित साहब के अंदर उसपे मै कडे शब्दो के अंदर निंदा करता हूँ की ऐसी घटना दुबारा ना घटे इसके लिये निश्चित आपके उपर विश्वास है की, इसपे आप सक्त कदम उठायेंगे इसके साथ ही आपको एक हमारे एक पार्टी के तरफ से हम तीन सदस्यो को मुझे अनिल भोसलेजी को, अजित पाटील को माननीय सदस्य के रुप के अंदर मै नियुक्त किया गया इसके लिये मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीसजी का, चंद्रकांत दादा पाटीलजी और मा. नरेंद्रजी चव्हाण और हमारे मिरा भाईंदर के नेता श्री. नरेंद्रजी मेहताजी का खुप खुप शुक्रगुजार हूँ की जिन्होने हम तिन्हो को इस सदन के अंदर जनताकी सेवा करने के लिये एक मौका दिया । साथही साथ मैं महापौर मॅडम आपका, उपमहापौर श्री. हसमुखजी गहलोत, सभागृहनेता दळवीजी, स्थायी समिती के सभापती दिनेशजी जैन, सभी नगरसेवक / नगरसेविका का मैं आभार मानता हूँ की जिन्होने हम तिन्हो के उपर विश्वास दिखाया और हमको नामनिर्देशीत सदस्यो के अंदर मैं यहा पे नियुक्ती की गई मुझे इस शहर के अंदर मैं २००७ से आजतक के अंदर मै आप सभी वरिष्ठ नेताओ के मार्गदर्शन मै काम करने का मौका मिला जितना हो सका शहर की सेवा करने की कोशीश की । निश्चित रुप के अंदर मै हमारे महापौर मॅडम आपके नेतृत्व के अंदर मै हमारे नेता श्री. नरेंद्रजी मेहता के नेतृत्व मै जो विकास कार्य हूये है उनको आगे बढाने के अंदर मै और वॉर्ड की जनताकी सेवा करने के लिये आप सभी का सहयोग लगेगा । मुझे निश्चित विश्वास है की आप लोगो का सहयोग मिलेगा । आयुक्त महोदय और प्रशासकीय सभी अधिकारीयो का मैं शुक्रगुजार करना चाहता हूँ की जो निरंतर सहयोग देते आ रहे है । हमारे इस कार्यकाल को मदत करेंगे ऐसी मे आशा करता हूँ । भारतीय जनता पार्टी के नेताओ को धन्यवाद देना चाहता हूँ । धन्यवाद मॅडम ।

मा. महापौर :-

सभापती साहेब बोला.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम, आयुक्त और सभी पदाधिकारी सभी का मैं दिल से धन्यवाद करता हूँ क्योकी स्थायी समिती पे जो सदस्य थे वो आज ८ सदस्य निवृत्त होने वाले है और उसकी जगह नये सदस्य आनेवाले है उनको भी मेरी शुभेच्छा और स्थायी समिती के सभापती पद के लिये मुझे इस सेवा महानगरपालिका मैं जो कार्य करने का जो औसर प्राप्त हूवा उसके लिये मैं मा. देवेंद्र फडनवीसजी का, चंद्रकांत दादा पाटीलजी का और हमारे लाडके आमदार माजी आमदार नरेंद्रजी का, महापौर जोत्सना हसनाळेजी का सभी का मै दिल से धन्यवाद करता हू और मै आयुक्त साहब का दिल से धन्यवाद करता हू की इतने दिन जब काम कर रहा था तो उन्होने मुझे पुरा सहयोग दिया हर काम मै और जितने भी अधिकारी है चाहे वो अतिरिक्त आयुक्त हो, एच.ओ.डी. हो उन्होने मुझे जब जब मैरे कोई भी विषय है उन्होने पुरा सहयोग मिरा भाईंदर के विकास के लिये दिया और जो भी मेरे स्थायी समिती के सदस्य जो मैरे साथ मै थे उन्होने मुझे पुरा सहयोग दिया और हम ज्यादा से ज्यादा कोरोना काल मै बाहर निकलने मै सक्षम रहे । और मैं आज तक के मैं पुरे सभी नगरसेवको का भारतीय जनता पार्टी का भी आभारी हूँ की उन्होने मुझे इस पद के लिये मुझे मनोमित करने के लिये मुझे सबने सहयोग दिया और खास करके आज मै इस बात पे बोलना चाहता हूँ मॅडम, की जो दिपक खांबितजी पे जो हमला हूँवा उसका तो मैं निषेध करता हू और हमारे भारतीय जनता पार्टी की तरफ से निषेध भी किया गया हूवा है लेकीन निषेध करने से वो विषय खत्म नही होता, मेरा ऐसा मानना है कही ना कही पदाधिकारी है, या अपने अधिकारी है मतलब एक आपके अंदर मै एक मिटींग लेके सभी जो ग्राऊंड लेव्हल पे काम करते है जैसे पानी पुरवठा के एच.ओ.डी. हो, या फिर कमिशनर साहब हो, या फिर अतिरिक्त आयुक्त हो, या दिपक खांबित हो, बारकुंड साहब हो कोई भी हो उनकी हम सुरक्षा भविष्य मै कैसे निर्धारीत कर सकते है उसके लिये आपके अध्यक्षता मे एक मिटींग लेके आयुक्त साहब सब मिल के अगर आप डिसीजन लेंगे तो आने वाले दिनो मै हम ऐसी घटनाओ को टाल सकते है, मेरा यही निवेदन है की जो प्रशासन अधिकारी जो काम करते है वो मिरा भाईंदर की सेवा करने के लिये दिन रात मेहनत करते है लेकीन उनके उपर अगर ऐसा हल्ला होता है वह बहूत ही दु:खद है और मै उसकी घोअर शब्दो मै निंदा करता हुँ जयहिंद, जय महाराष्ट्र ।

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य अनिल सावंतजी बोला.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम धन्यवाद, मिरा भाईंदर शहराच्या इतिहासामध्ये अत्यंत लाजीरवाणी आणि काळीमा फासनारी घटना ३० तारखेला घडली. ह्या महानगरपालिका प्रशासनाचे व्होनार कार्यक्षम कार्यकारी अभियंता दिपक खांबित यांच्यावर भ्याड हल्ला झाला काँग्रेस पक्षाच्या वतीने त्याचे जाहिर निषेध करतो. आज मिरा भाईंदर शहराला पोलिस आयुक्तालय मिळाले आहे, सिक्युरिटी सिस्टीम, मा. आयुक्तांनी मिरा भाईंदर महानगरपालिकामध्ये त्यामध्ये सुधारणा केलेली आहे, नवीन सिक्युरिटी गार्ड ह्या ठिकाणी आलेले आहेत तरी सुध्दा असे असते वेळी सभागृहानेते प्रशांत दळवीने एक चांगला मुद्दा उपस्थित केला होता. महानगरपालिकेमध्ये डिपार्टमेंटला भेटायला जे लोक येतात त्यांची स्कुटणी किंवा मेटल डिटेक्टर अर्थात त्यांची तपासणी होते का? कारण हा हल्ला कुठे तरी महानगरपालिकेशी निगडीत कामे करतांना झाला असावा असा दाट संशय आहे पोलिस आपले काम करतील पण त्यामध्ये जास्तीत जास्त आयुक्तांने इनेशियटीव्ह घेवून यापुढे महानगरपालिकेतील अशा कुठच्याही अधिकाऱ्यावर अशा प्रकारे हल्ला होऊ नये यासाठी काय खबरदारी घेता येईल याची जरुर कार्यमिमांसा करा आणि ह्या शहरामध्ये ह्या शहराचा इतिहास आहे, गुंडागर्दीचे हे शहर नाही, प्रशासन,

लोकप्रतिनिधी, सामान्य जनता ह्या शहराच्या विकासासाठी हातात हात धरून काम करत आहे, त्यामुळे हा जो भ्याड हल्ला झालेला आहे तो अतिशय निंदनिय आहे, काँग्रेस पक्षाच्या वतीने मी त्याचा निषेध करतो आणि मा. आयुक्तांना विनंती करतो की, त्यांनी लवकरात लवकर त्याचा शोध लावावा, पोलिसांना त्याबाबतीत प्रेशाराईज करावे आणि यापुढे अशा घटना घडू नये याची काळजी घ्यावी तसे पाऊल उचलावीत धन्यवाद !

महापौर मॅडम :-

ठिक आहे मला वाटते बऱ्याच सन्मा. सदस्यांनी ह्या ठिकाणी मिरा भाईंदर प्रशासनाचे कार्यकारी अभियंता दिपक खांबित याच्यावरती जो हल्ला झालेला आहे त्याबाबत निषेध व्यक्त केलेला आहे त्याबाबतची निंदा व्यक्त केलेली आहे की अशा पध्दतीचा अतिशय गंभीर कृत्य जे झालेले आहे याबबत सर्वच लोकप्रतिनिधी, सन्मा. दिपक खांबितजी यांच्या पाठींबाला सदैव तयार आहेत परंतु प्रशासनाच्या माध्यमातून ह्याठिकाणी खुलासा होणे गरजेचे आहे मी मा. आयुक्त यांना विनंती करते की, त्यांनी खुलासा करावा.

आयुक्त :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, सर्वांना नमस्कार परवा दिवशी संध्याकाळी २९ तारखेला संध्याकाळी ७-८ च्या दरम्यान आपले कार्यकारी अभियंता दिपक खांबित साहेब हे त्यांच्या घरी जात असतांना त्यांच्यावर जो भ्याड हल्ला झालेला आहे आणि त्यांना इजा पोहचावी ज्या उद्देशाने किंवा त्यांना ठार करण्याचा उद्देशाने अर्थात हल्ला करतात तो नक्कीच वाईट कृत्य करण्यासाठी करतात त्याचा आज सर्वप्रथम महानगरपालिकाच्या सर्व अधिकाऱ्यांच्या वतीने आपला सर्वांच्या तर्फे तिव्र शब्दात निषेध व्यक्त करतो, त्याच प्रमाणे काल सकाळी आम्ही सगळे ९.००, ०९.१५ वाजता सर्व अधिकारी / कर्मचारी एकत्र येवून सर्वांनी निवेदन दिले तेच निवेदन आपण पोलिस आयुक्तांना दिलेले आहे, पोलिस आयुक्त मिरा भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयासाठी तसेच राज्य शासनाकडे तात्काळ कालच्या काल पाठविलेले आहे आणि सर्व सन्मा. सदस्यांनी जी मागणी केलेली आहे की लवकरात लवकर त्याचा शोध लावण्यासाठी आपण पोलिसांना प्रेशाराईज करावे. परवा दिवशी जेव्हा हल्ला घडला तर मला फोन आल्यानंतर संबंधित पोलिस ऑफिसरशी फोन करून बोलणे झाले, इथले एक ACP, DCP यांच्या सतत मी संपर्कात परवा ही होतो, काल ही होतो, आजही आहे. आपले खांबित साहेब आहेत त्यांच्या ही संपर्कात आहे, बाकी तपासाचा जो भाग आहे तो पोलिस तपास करत आहेत, अद्याप कोणाचे नाव समोर आलेले नाही किंवा कोणाला अटक केलेली नाही अजून तसे झालेले नाही, जशी जशी माहिती मिळेल तशी तशी मी सभागृहाला प्राधान्याने प्रायोरीटीव्ह सांगेल. त्याचप्रमाणे सर्व सन्मा सदस्यांनी एक सुचना केली मेटल डिटेक्टरची केली, मेटल डिटेक्टरचा महत्त्वाचा रोल आहे कारण महानगरपालिकाच्या इथे येतांना सर्व लोकप्रतिनिधी, सर्व नगरसेवक आपण इथे कामासाठी भेटत असतो. महापौर, उपमहापौर आणि सन्मा सदस्यांची इतर पण दालने आहेत सर्व अधिकाऱ्यांची दालनं आहेत तर मेटल डिटेक्टरचे आपण जी सुचना केली ती तात्काळ अंमलबजावणी करून तो लवकरच बसविण्यात येईल त्याच प्रमाणे आपल्या सगळयांना एक विनंती आहे, सर्व पत्रकार बंधुना ही विनंती जेव्हा आपल्याला सिक्युरिटी चेकिंगसाठी थांबवतील किंवा विचारतील तर सर्वांना प्रशासनाच्या वतीने विनंती आहे आपण सहाकार्य करावे अशी दुर्दैवी घटना घडते त्यावेळेस नंतर आपण त्याच्यावर प्रकाश टाकतो आणि २-४ दिवसानंतर परत आपण विसरून जातो परंतु मंत्रालयापासून अनेक महत्त्वाच्या MMRDA च्या ऑफिसात सगळयाच ठिकाणी सिक्युरिटी आहे. आपल्या सगळयांच्या सिक्युरिटीसाठी सुरक्षा जवान आपले तपासणी करण्यासाठी किंवा सिक्युरिटीसाठी विचारतात त्यामागे त्यांचा कुठलाही हेतू नसून आपल्या सगळयांच्या जीवीताला धोका होऊ नये यासाठी ते करत असतात आपण सर्व लोकप्रतिनिधी आपल्या मार्फत पण जनतेला आव्हान करावे, आम्ही आव्हान करतो, पत्रकार बंधुना ही विनंती करतो त्यांच्या मार्फत ही आव्हान करा आणि सिक्युरिटीला सर्वांनी सहकार्य

करावे, जेवढे प्रशासनाला ज्या ज्या अधिकाऱ्यांना संरक्षणाची गरज आहे त्याच्यासाठी प्रशासनाला एक प्रशासनाचा प्रमुख म्हणून मी आपल्याला निश्चित पणाने सांगणे की त्यांना सुरक्षा देण्यात येईल, त्याच बरोबर ज्या लोकप्रतिनिधीना असा जीवीताला धोका असण्याची शक्यता आहे किंवा त्यांची मागणी असेल पोलिसांची असेल तर त्यांनाही सुरक्षा देण्यासाठी महानगरपालिकेचा प्रशासन प्रमुख म्हणून मी कायम तत्पर आहे आणि जशी मागणी येईल त्यानुसार ती देण्यात येईल आणि तपासात प्रगती होईल तशी आपल्याला सभागृहाला अवगत करण्यात येईल आणि ह्या पुढे असा हल्ला होऊ नये म्हणून शासनाचे अधिकारी सगळे एच.ओ.डी. आम्ही बारीक जातीने लक्ष ठेवून आहोत आपण ही राहावे एवढे बोलून थांबतो. धन्यवाद.

महापौर :-

सन्मा सभागृहानेता दळवी साहेब आपण बोला.

प्रशांत दळवी:-

मा. महापौर मॅडम, महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री. दिपक खांबीत हे कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत आहेत. श्री. दिपक खांबित हे अतिशय हुशार, अभ्यासू, कर्तव्यदक्ष व सर्वांशी सौजन्याने वागणारे आणि प्रामाणिक अधिकारी आहेत. ह्या शहरातील सर्वपक्षीय नगरसेवकांच्या प्रभागात विकास कामांवरती त्यांचे जातीने लक्ष असते. श्री. दिपक खांबीत हे स्वत: शहरातील विकास कामे वेळेत व तत्परतेने कशी होतील याकडे जातीने लक्ष घालून कामे पूर्ण करीत आहेत. अशा कार्यक्षम अधिकाऱ्यावर बुधवार दि. २९/९/२०२१ रोजी भ्याड हल्ला करण्यात आला. मा. महापौर मॅडम अशा प्रकारचे हल्ले कुठल्याही अधिकारी / कर्मचाऱ्यांवरती जर होत असतील तर हे खपवून घेतले जाणार नाही. दि. २९/९/२०२१ रोजी आपल्या कार्यालयातून श्री. दिपक खांबित साहेब घरी जात असतांना त्यांच्या वाहनाचा मोटरसायकलवरून पाठलाग करण्यात आला व बोरिवली नॅशनल पार्कच्या दरम्यान त्यांच्यावरती भ्याड हल्ला करण्यात आला. या हल्यात श्री. दिपक खांबीत साहेब थोडक्यात बचावले आहेत. या भ्याड हल्याचा मी व हे सभागृह जाहिरपणे निषेध व्यक्त करतो. या हल्ल्या संदर्भात आज ह्या विशेष महासभेत तिव्र पडसाद उमटले आहेत. सर्व पक्षांचे गटनेते असो किंवा सर्व लोकप्रतिनिधी नगरसेवक यांची एकच भावना झालेली आहे की हा हल्ला ज्यांनी कोणी केला असेल ते तातडीने पकडले जावेत व त्यांच्यावर कडक कारवाई व्हायला पाहिजे आणि म्हणून महापौर मॅडम आणि आयुक्त महोदय आपणांस माझी विनंती राहील की आपण शासनाचे मा. मुख्यमंत्री व मा. गृह राज्यमंत्री यांना आपल्या महानगरपालिकेतर्फे या हल्या संदर्भात पत्रव्यवहार झाला पाहिजे. तसेच ज्या ज्या वेळेला आमची आवश्यकता लागेल आम्ही पूर्ण सदन, सभागृह आपल्या पाठीशी आहोत. महापौर मॅडम ह्या हल्ल्याच्या निषेधार्थ आजची विशेष महासभा या ठिकाणी आपण तहकूब करावी अशी मी आपणास विनंती करतो. धन्यवाद.

मा. महापौर:-

सभागृहनेते प्रशांत दळवी साहेब यांनी जी सुचना केलेली आहे जी विनंती केलेली आहे सभागृहाच्या वतीने की मिरा भाईदर महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता श्री. दिपक खांबित ह्यांच्यावर झालेला हल्ला याच्या निषेधार्थ आजची ही सभा तहकूब करण्यात येत आहे.

**सभा तहकुबी ठराव क्र. ४७ :-**

मा. महापौर मॅडम, महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री. दिपक खांबीत हे कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत आहेत. श्री. दिपक खांबित हे अतिशय हुशार, अभ्यासू, कर्तव्यदक्ष व सर्वांशी सौजन्याने वागणारे आणि प्रामाणिक अधिकारी आहेत. ह्या शहरातील सर्वपक्षीय नगरसेवकांच्या प्रभागात विकास कामांवरती त्यांचे जातीने लक्ष असते. श्री. दिपक खांबीत हे स्वत: शहरातील विकास कामे वेळेत व तत्परतेने कशी होतील याकडे जातीने लक्ष घालून कामे पूर्ण करीत आहेत. अशा कार्यक्षम अधिकाऱ्यावर बुधवार दि. २९/९/२०२१ रोजी भ्याड हल्ला करण्यात आला. मा. महापौर मॅडम

अशा प्रकारचे हल्ले कुठल्याही अधिकारी / कर्मचाऱ्यांवरती जर होत असतील तर हे खपवून घेतले जाणार नाही. दि. २९/९/२०२१ रोजी आपल्या कार्यालयातून श्री. दिपक खांबित साहेब घरी जात असतांना त्यांच्या वाहनाचा मोटरसायकलवरून पाठलाग करण्यात आला व बोरिवली नॅशनल पार्कच्या दरम्यान त्यांच्यावरती भ्याड हल्ला करण्यात आला. या हल्यात श्री. दिपक खांबीत साहेब थोडक्यात बचावले आहेत. या भ्याड हल्याचा मी व हे सभागृह जाहिरपणे निषेध व्यक्त करतो. या हल्ल्या संदर्भात आज ह्या विशेष महासभेत तिव्र पडसाद उमटले आहेत. सर्व पक्षांचे गटनेते असो किंवा सर्व लोकप्रतिनिधी नगरसेवक यांची एकच भावना झालेली आहे की हा हल्ला ज्यांनी कोणी केला असेल ते तातडीने पकडले जावेत व त्यांच्यावर कठोर कारवाई व्हायला पाहिजे आणि म्हणून महापौर मॅडम आणि आयुक्त महोदय आपणांस माझी विनंती राहील की महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री व मा. गृह राज्यमंत्री यांना आपल्या महानगरपालिकेतर्फे या हल्या संदर्भात पत्रव्यवहार झाला पाहिजे. तसेच ज्या ज्या वेळेला आमची आवश्यकता लागेल आम्ही पूर्ण सदन, सभागृह आपल्या पाठीशी आहोत. महापौर मॅडम ह्या हल्ल्याच्या निषेधार्थ आजची विशेष महासभा या ठिकाणी आपण तहकूब करावी असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका